# देवचाफ्याचे दिवस.........

विद्या हर्डीकर सप्रे

देवचाफ्याची माझी पहिली आठवण आजोळगावी ग्रामदेवतेच्या देवळाभोवती बहरलेले अनेक वृक्ष पहिल्याची. लांबटपानांचं अस्तित्व लपवून टाकणारे, पिवळे अंतर्भाग आणि भोवतीचं रेखीव शुभ्र असोशीनं जपणारे फुलांचे गुच्छ! पायांशी पसरलेल्या फुलांतून उकलत जाणारा त्यांचा मंद गंध! ती फुलं वेचून त्यांच्या पाकळ्यांना छेद देत त्या देठात गुंफण्यात आम्ही रंगत जात असू. मग त्या सुवर्णमय अंगठ्या बोटांच्या फटीत धरून “श्रीमंत” होण्यातही गंमत वाटे..

पुणे विद्यापीठाच्या आवारात जरा निर्मनुष्य भागात असे ओळीने लावलेले देवचाफे होते.
ते बहरले की मला पोक्तशा, सालंकृत, प्रेमळ सुवासिनी दिसायच्या... त्या वृक्षांच्या पसरट फांद्यातला प्रेमळपणा काहीसा दूरस्थ वाटे.
फर्ग्युसन महाविद्यालयात असतांना ते बहरलेले देवचाफे पहाण्यासाठी आम्ही काही मैत्रिणी मुद्दाम विद्यापीठात जात असू.
त्यातच “यशोदा” ही असे. तिच्या मंद हसण्याला तो देवचाफ्याचा दूरस्थ प्रेमळ गंध होता.
यशोदा हे तिचे काही खरं नाव नाही. ते तिचं कवयित्री म्हणूनचं लेखणी नाव! फर्ग्युसन महाविद्यालयात ती मला भेटली. वास्तविक आम्ही काही एका वर्गात नव्हतो. ती कलाशाखेत तर मी शास्त्र शाखेत. आमचे स्वभावही भिन्न! पण तिच्या कवितांनी आमचे ऋणानुबंध जमवले.
‘हवामे उडता जाए,  मेरा लाल दुपट्टा मलमलका...’ असल्या कविता(?) म्हणण्याच्या उडत्या वयात यशोदा कविता करत होती:

‘पहा कधीचे उतरवलेत
रुमझुमते नूपुर, तांबूस आळिते!
आता तरी दाखवशील ना
तुझ्या भगव्या अंगारवाटा?

फुलं? कधी माळली होती?
ही दरवळतेय ती मीच.
गाणी? कधी गायली होती?
ही झंकारतेय तीही मीच.

खरं तर
तू कोण आणि मी कोण?
घडतं सरत जग कोण?
अद्वैताच्या फांदीवरचं

न फुललेलं फूल तरी कोण?'

काहीश्या गंभीर वृत्तीच्या या कवितेतली शब्दांमागची धग समजण्याची पोच नव्हती, पण ती जाणवत होती नक्कीच! आम्हा मैत्रिणींच्या कोलाहलात 'यशोदा' शांतपणे वहीत कविता लिहायची,आणि तिची शाई वाळायच्या आत ते शब्द आम्हा मैत्रिणींच्या स्मरणात गुंतून जायचे. तिच्या शब्दाचं आणि "वाचमरथो अनुधावति" अशा त्यामागच्या अर्थाच्या अवकाशाचं एक विलक्षण आकर्षण वाटत असे.

एकदा माझ्या वाढदिवसाला तिनं मला शुभेछ्या कार्ड दिलं, त्यावर लिहिलं होत :

'इवलेसेही मळभ आपुल्या
आभाळावर दाटू नये ।
असो कितीही तलखी असली
खोल जिव्हाळा अटू नये ।।

माझ्यासाठी म्हणून खास केलेल्या कवितेनंच मला तेंव्हा थोर वाटलं! तो खोल जिव्हाळा अजूनही आमच्यात झुळझुळतो आहे.

त्या कवितेनंतर जवळ जवळ एक तप लोटलं तेंव्हा तिचा कवितासंग्रह प्रसिध्द झाला आणि तो माझ्या हातात तिनं ठेवला ती अमेरिकेत तीन महिन्यांसाठी आली होती तेव्हा!

महाविद्यालयाच्या निर्भर दिवसातल्या वह्यांच्या पानावर मुक्त फडफडणाऱ्या तिच्या कविता "देवचाफे" याच नावाच्या कविता संग्रहात पहिल्या आणि जुन्या देवचाफ्यांच्या दिवसांच्या आठवणी जाग्या झाल्या. ती "माझी" कविता "देवाचाफे" त दिसली ती पाहून भरून आलं!

तेच जुने चिरपरिचित शब्द पहिले.. अर्थात माझं अवकाश आता प्रगल्भ झालं होतं. आपल्याच कवितांचा संग्रह प्रसिध्द झाल्यासारखी मी हरखून गेले. 'ए तुझी "ती" कविता आहे का ग आणि ही कविता पण आहे ना या संग्रहात' असं म्हणत मी ओळखीच्या खुणा शोधू लागले...

'यशोदा' थक्क होऊन माझ्याकडे पहात होती, ती जवळ जवळ सगळाच संग्रह तोंडपाठ आहे म्हणून ..

त्यावेळी मी चकित झाले होते, ते तिच्या त्या शब्दांमागचं 'समंजस शहाणपण' पाहून!

अजूनही मी 'देवचाफे' चं कोणतही पान उघडते तेव्हा चकित होते. वयाच्या सोळाव्या सतराव्या वर्षी या कविता लिहिल्या आहेत यावर विश्वासच बसत नाही!

या संग्रहाला कुसुमाग्रजांची प्रस्तावना लाभली आहे. त्यांनी लिहिलं आहे,

"कवितेचे मोल, आपल्याला भावलेल्या जीवनाच्या एवढया तपशिलात ती किती खोलवर जाऊ शकते, लौकिकाला ऐकू न येणारे भावनांचे अंतर्गत झंकार ती शब्दांपर्यंत कितपत पोचवू शकते यावर अवलंबून असते. हे सामर्थ्य यशोदेच्या काव्यात भरपूर आहे."

आधी मुळात "लौकिकाला ऐकू न येणारे भावनांचे अंतर्गत झंकार" यशोदेच्या इतक्या लहान वयात कसे बरं ऐकू आले?

"कळलेसे वाटते
तेच निसटून जाते
अशा नकळतेपणी
तेच झंकारु पहाते" .....
...तेच झंकारु पहाते

आणि देह अबोधतो
पर्णहीन देवचाफा
विस्मयाने भांबावतो!"

या कवितेतून तिनंही त्या झंकाराचा विस्मय व्यक्त केला आहे की काय?

आतले झंकार आणि भोवतीची अल्लड सळसळ या दोहोंमध्ये तिची घालमेल झालेली तिच्या काही कवितांतून जाणवते. उदा:

'पैलतटावर तुझा पुकारा
ऐलतटावर ही मी नास्तिक
मध्ये वाहते शबल अहंता
त्यातच माझे तेवत आर्तिक ।'

त्या वयाच्या सहजसुलभ भावनांचे नूपुरही तिच्या कवितेत आहेत. पण कुसुमाग्रजांच्या शब्दात "या अनुभवातूनही
एक विरक्तीचा, संन्यस्त वृत्तीचा स्वर आहे."

एकीकडे तरल काव्यात्मकता आणि दुसरीकडे तिच्या वृत्तीतली विरक्तीची ओढ याचं ते तिच्या कवितेत पडलेलं प्रतिबिंब असाव असं मला वाटतं.

आम्रपाली ही या संग्रहातली माझी एक आवडती कविता आहे:

आयुष्याचं ओलं वाळवंट
कितीकितीकांच्या पाऊलखुणांनी
गजबजलेलं.
वीतरागिन
फक्त तुझ्याच
निरासक्त पाऊलखुणेत
सगळी ओल कशी खेचलीस
ते जाता जाता,
मुळीच मागे न वळून न पाहता
सांगशील का?

या कवितेत मला यशोदेचं विरक्तीचं आकर्षण दिसतं. म्हणूनच ती अगदी अनावर क्षणीही

"पटेल का तुज? ओठ निग्रही
स्तब्ध जाहले पेल्यापाशी" अशी स्वत:ला आवरून घेत होती आणि
"कारण बहुपाशाहूनही दृढ होतं
आपल्यातलं समंजस निळ अंतर .. " असं पोक्तपणानं स्वत:ला समजावत होती?

मला वाटायचं की तिनं स्वत:तले कोवळे अंकूर असे 'समंजसपणानं' थोपवू नयेत.

'सहवासाचे पदर सोलता
गळली हसरी हिरवी झगमग
ओल्या एकाकी गाभ्याला

सोसवेचना तळव्याची धग’

अशी त्या कोवळ्या वयातली अनुभूती तिच्या कवितेत पाहिली की बरं वाटत असे. या कणिकेतली प्रतिमा नजरबंद करणारी आहे.

यशोदेच्या कवितेतल्या प्रतिमा तेव्हाही थक्क करणाऱ्या आणि आजही...

“अश्वत्थामा” नावाची कविता मला अशी थक्क करते...

चिरजीवन कालाचे
विध्द शाप जळजळता
मध्यान्ही माथ्यावर
सूर्यव्रण भळभळता
स्निग्धरात्र पाझरते
चंद्राचे चिंधुकलेपणाला
वणवणत्या जखमेवर
चांदणेच फुंकरले!

यशोदेच्या कवितेला वणवण करणारा मरण मुक्त अश्वत्थामा भेटतो तसा साक्षात मृत्यूही भेटतो. तसं पाहिलं तर हा मृत्यू माणसाच्या देहापासून केवळ श्वासाच्या अंतरावर. पण जाणिवांपासून खूप दूर असतो. क्वचित, मृत्युच्या अगदी जवळ जाऊन त्याच्या चेतनाहीन, बर्फाळ स्पर्श करून माणूस परत जीवनाच्या गलबल्यात मिसळून जातो. (कुसुमाग्रजांच्या शब्दात) ‘ऐहीकाचा विराट नकाशा निमिषार्धात पुसून टाकणारा हा अनुभव’ विलक्षण थरारक असला पाहिजे.

यशोदेनं त्या अनुभवाला वयाच्या विशीत कसं बरं शब्दाबद्ध केलं?

तिनं तो अनुभव नुसता साकारला नाही तर, त्या “निर्मम सत्याच्या” दिशेने झालेल्या प्रवासात तिला गवसलेलं आयुष्याचं सारही स्पष्ट रेखाटलं आहे.

पैलतटाची हाक जवळ येते, तेव्हा काळजानजीक जपलेली भावबंधनं क्षीण होतात.

‘शोष तर इतका विलक्षण होता
की तुमची नावंही कंठात पोळली-करपली
हाका होरपळून पांगळ्या झाल्या.
सहदेव, नकुल, अर्जुन, भीम ..
द्रौपदी तर प्रथम कोसळली.
तशीच कोसळत गेली तुमची स्मरणं..
एखाद्या सामान्य इच्छ्येचं श्वानसुध्दा
सोबतीला राहिलं नाही...”

अशी त्या प्रवासातली मनाची अवस्था वर्णन करत करत यशोदेच्या कवितानुभवाला पुढे रक्त गोठवणाऱ्या गारठ्यातून आणि काळोखाच्या लाटांतून शरीराचे ओझे कसे बसे वहात प्रवास करावा लागतो...

त्यावेळी अचानक पावले स्थिरावतात आणि समोर प्रकट होतं एक परमशुभ्र निर्मम सत्य.

ते विचारतं :

“सगळा सोस संपला ना ?
अमरपटटा घेऊन आल्याचा भ्रम

आता दूर झाला ना?
आता परत जा.
पुन्हा येशील तेव्हा भांबावणार नाहीस”.
त्या सत्याने बोटात सरकवलेले ‘पवित्रक’ घेऊन जेंव्हा कवितेतली “मी” परत जीवनात, आपल्या प्रिय माणसात परत येते, तेव्हा प्रेमाची उत्कटता वाढलेली असली तरी त्या सर्वांचा चिरवियोग सहन करण्याची सहनसिद्धी ‘पवित्रकाने’ दिली आहे!
“पण माझ्या अनामिकेतल्या पवित्रकात
तुमच्या वियोगाची सहनसिद्धी आहे
हे मी तुम्हाला सांगू शकले नाही!”
इथे संपणारी कविता रसिकाला एका वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवते. मराठीत मृत्यू या विषयावर फार थोडया कविता आहेत, यशोदेची “प्रवासाहून परतल्यावर ही कविता त्यातल्या सर्वोत्कृष्ठ कवितांच्या रांगेत जाऊन बसणारी आहे.
यशोदेच्या कवितेतल्या प्रतिभासंपन्नतेचा आवाका असा सर्वदूर.. पण तिनं नंतर कविता केल्याच नाहीत फारश्या.. तिचातल्या विरक्त वृत्तीला रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीतली मधुराभक्ती मानवली होती आणि विसाव्या वर्षी तिनं गीतांजलीचा मराठी अनुवाद केला. पण तो प्रसिध्द मात्र केला नाही. तिला त्या बद्दल जाब विचारला, तर नुसतं हसते!

---

3 मार्च 2025
डिसेंबर 2024 या महिन्यात मी तिला भेटायला गेले होते. तेव्हा तिन  मला दोन पुस्तक भेट दिली. देवचाफे आणि रवींद्रनाथांच्या गीतांजलीचा अनुवाद !  तिच्या बहिणीने आवर्जून हा अनुवाद प्रसिद्ध केला. किती धन्यवाद देऊ तिला ?
यशोदाची माझी ओळख कवितेच्या च्या प्रेमातून झाली.. आणि शेवटची भेट सुद्धा कवितेच्या अनुबंधान ..
कालिदासाची एक काव्यपंक्ती आठवते आहे..
“ भावस्थिराणि **जननान्तरसौहृदा**णि |”

---

आणि ज्या कवितेवरून संग्रहाला नाव दिल ती  कविता :

ते  दोन देवचाफे ..

# ते दोन देवचाफे

धग दाटली शिवारी गेले तडे भुईला
अन् राख हिर्वळीची उडता भिडे नभाला
ग्रीष्मात ऐन ऐशा प्राणान्तिच्या क्षणाला
बहरून येत कैसे ते दोन देवचाफे ?

प्राणान्तिच्या क्षणाला गेली उडून राख
उकलून ओठ आला अस्पष्ट शब्द एक
ती साद पोचली की वाऱ्यासवे कुणाला
कोषातुनी कळ्यांचा प्रतिसाद शुभ्र फाके !

कैशा परस्परांच्या फांद्या झुकून आल्या ?
स्पर्शून सावल्याही गेल्या, कधी न गेल्या
प्रलयातला विसावा झाले कुणी कुणाला
भांबावल्या दिशांना अडलेत प्रश्न सोपे !